# जागतिकीकरणाचा भारतीय शेती क्षेत्रावर झालेला परिणाम

**राहुल नागुर्डेकर ,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

जागतिक अर्थव्यवस्था कठिण परिस्थितीतून मार्गक्रमण करीत असताना भारतीय अर्थव्यवस्था सुरळीतपणे चालू आहे असे आपणास म्हणता येणार नाही. भारत सरकारला लंडनच्या बँकेत सोने गहाण ठेवून परकिय चलन गंगाजळीत उभी करण्याची गरज भासली. जागतिक वित्त संस्थांनी कर्जासाठी असंख्य जाचक अटी घातल्या आणि भारताला जगाशी जोडणे अपरिहार्य करून टाकले. दरम्यानच्या काळामध्ये (१९९०-९१) तत्कालीन भारताचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी जागतिकीकरणाचा स्वीकार केला. या जागतिक घडामोडीमुळे संपूर्ण भारतावर प्रामुख्याने शेती क्षेत्रावर विविध परिणाम झाले या परिणामातून आमची शेती व अर्थव्यवस्था डबघाईला आली आहे.

जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर भारतीयांना असे वाटले की, आपल्या शेतीमालाला, उत्पादनाला निश्चित बाजारपेठ मिळेल, ती मिळाल्यामुळे शेती उत्पादनाना हमी भाव मिळून चार पैसे दरवाढ मिळेल. परिणामी शेती व शेतकऱ्याची आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती व राहणीमानाचा दर्जा सुधारेल या अपेक्षेपोटी भारतामध्ये शेतीमालाच्या उत्पादनामध्ये प्रचंड वाढ होत गेली. एकीकडे उत्पादन वाढले असताना अर्थशास्त्रीय नियमानुसार (बाजारपेठेच्या) उत्पादन वाढल्यास म्हणजे वस्तुची आवक वाढल्यास भाव कोसळतात हीच बाब भारतीय शेतमालाच्या संदर्भात घडून आली. ही परिस्थिती शेती व शेतकऱ्यांवर येण्यासाठी जागतिकीकरण कारणीभूत आहे.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये जागतिकीकरण म्हणजे काय? जागतिकीकरणाचे फायदे-तोटे, भारतीय शेतीची स्थिती व जागतिकीकरणाशी असलेला संबंध तसेच त्यांचा भारतीय शेतीक्षेत्रावर, शेतकऱ्यांवर झालेल्या विविध परिणामाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**जागतिकीकरण :**

जागतिकीकरण म्हणजे आपली अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर खुली करणे होय. म्हणजेच देशादेशामध्ये आर्थिक व्यापारासाठी, आयात निर्यातीसाठी विशिष्ट नियमांच्या अधिन राहून आपली अर्थव्यवस्था खुली करणे होय. या खुलेपणामुळे देशादेशामधील व्यापारात वाढ होऊन अविकसित राष्ट्रांना आपला आर्थिक सामाजिक दर्जा उंचावता येईल.

जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेताना आपणाला असे म्हणता येईल की व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर पर्यावरण राहणीमान, शासन समाजव्यवस्था आणि संस्कृती अशा सर्व क्षेत्रातून होत राहणारे रूपांतर होय. जागतिकीकरणामध्ये प्रामुख्याने वित्त व भांडवल यांची मालकी, बाजार व स्पर्धा, ज्ञान व संशोधन, आणि यांना संलग्नीत असणारे तंत्रज्ञान तसेच नवनवीन वस्तुद्वारे उपभोगाचे सारखेपण व राहणीमानाचे आधुनिकीकरण यांचा समावेश होतो.

जागतिकीकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेता आपणास असे दिसते की, १९७० च्या दशकापासून जागतिककीरणाला सुरूवात झाली. आंतरराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्यामार्फत राष्ट्रांना कर्ज पुरवठा करते वेळी घातलेल्या विविध नियम व अटीतून जागतिकीकरणाची सुरूवात झाल्याचे दिसते. त्याचे कारण असे की, विकसीत देशांची उत्पादक यंत्रणा सज्ज असताना प्रभावी मागणी तोकडी पडते म्हणून भविष्यात येणाऱ्या आर्थिक मंदीवर, पूर्ण रोजगारासाठी सक्रिय हस्तक्षेप व प्रत्यक्ष गुंतवणूक करण्याचे धोरण १९५० च्या दशकात अवलंबिले, पण त्यामुळे नोकरशाहीची पकड वाढत गेली, कामगार संघटना व इतर हितसंबंधी गट आपल्या स्वार्थासाठी शासनव्यवस्थेला व जनतेला धारेवर धरू लागल्या याऊलट दुसरीकडे शासकीय उद्योगाच्या वित्तिय गरजा भागविण्यासाठी कर्जे उभारली गेली. यांचा परिणाम म्हणजे खाजगी उपक्रमशीलतेची गळचेपी होऊ लागली. या परिस्थितीमुळे शासकीय पातळीवरून म्हणजे सरकारने उत्पादन क्षेत्रातून अंग काढून घ्यावे असा विचार पुढे आला या विचाराला अनुसरून खुलेपणा स्वीकारणारी अनेक धोरणे अवलंबली गेली.

१९७० च्या दशकात सार्वत्रिक दुष्काळाने संपूर्ण जनतेला ग्रासले होते. त्यातुन बेकारी, दारिद्र्य, उपासमार व महागाई यासारख्या विविध गोष्टींना तोंड द्यावे लागले. यांचा फायदा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी घेतला आणि त्यांचा विस्तार वाढला खऱ्या अर्थाने येथुनच जागतिकीकरणाचा उदय झाला असे आपणास म्हणता येईल.

**भारतीय शेती :**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय उत्पादनामध्ये व निर्यातीमध्ये शेती क्षेत्राचा वाटा आज घसरत जाऊन (२०११-१२) १७.२% आला आहे. परंतु ६४% लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. वाढत्या लोकसंख्येचा भार इतर क्षेत्राऐवजी शेती क्षेत्रावर अधिक पडत आहे. त्यातून निर्माण होणारे विविध प्रश्न तसेच पावसाची अनियमितता, अनियमित विजपुरवठा, खताच्या व किटकनाशकांच्या वाढत्या किंमती मशागतीसाठी येणारा खर्च अशा अस्मानी व सुलतानी संकटामुळे भारतीय शेती नेहमीच परिघस्थानी किंवा अडचणीत राहीली आहे असे दिसते. पंडित जवाहरलाल नेहरू स्वत: असे म्हणाले होते की, बाकी सगळ्या गोष्टी/ क्षेत्रे थांबवू शकतील पण शेती नाही. यावरून भारतीय शेतीच्या स्थितीची परिस्थिती आपणास लक्षात येते.

काळाच्या ओघात शेती क्षेत्रामध्ये बदल होत गेले. त्यापैकी महत्त्वाचा बदल म्हणजे १९७० च्या दशकात झालेली हरितक्रांती होय. हरितक्रांतीमुळे शेती क्षेत्रामध्ये नवनवे संशोधन झाले. या संशोधनामधुन तांदुळ, गहु यासारख्या अधिक उत्पादन देणाऱ्या नव नविन जाती शोधल्या गेल्या, तर तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या दारी येऊन पोहचले परिणामी शेती उत्पादनामध्ये वाढ झाली या वाढत्या उत्पादनामुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. हरित क्रांतीमुळे भारतीय शेतीला असणारा पशुपालन हा पुरक व्यवसाय अधिक बळकट झाला. त्यातून दुग्धउत्पादनासारखा जोडधंदा पुढे येऊन शेती व शेतकरी हितासाठी प्रेरक आणि पुरक ठरला. यावरून आपणाला असे म्हणता येईल की, येथील शेतकऱ्यांचा उदर निर्वाहाचा प्रश्न सुटला आहे यापुढे जाऊन जरी उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला असला तरी हरित क्रांतीमुळे वाढलेल्या उत्पादनाला

(शेतमालाला) किफायतशीर भाव मिळणे अपेक्षीत होते. परंतु तसे काही घडले नाही. परिणामी १९८० च्या दशकात देशामध्ये शेतकरी वर्गात हमी भावाबदल असंतोषाची एक लाट निर्माण झाली. पुढे या असंतोषाचे पर्यवसन शेतकरी आंदोलनामध्ये झाल्याचे आपण पाहिले आहे.

१९९० च्या दशकात भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केला. जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे येथील विविध क्षेत्राबरोबरच शेती क्षेत्रावरही विविध परिणाम झाले आहे.

**जागतिकीकरणाचा शेती क्षेत्रावरील परिणाम :**

जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे भारतीय शेती क्षेत्रावर अनेक बरे-वाईट परिणाम झाले आहेत. जागतिकीकरणाच्या स्वीकारावेळी भारतवासीयांना, येथील अर्थतज्ञाना आणि समाज्यातील विविध विचारवंत मंडळींना असे वाटत होते की, जागतिकीकरणामुळे आपणाला चांगले दिवस येतील म्हणजे १) भारतीय शेती उत्पादनाची निर्यात वाढेल. २) शेती मालाला भारतीय बाजारपेठेतील किंमतीपेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जास्त किंमती मिळतील. ३) शेतमालाच्या निर्यातीचे प्रमाण वाढुन परकिय चलन मिळेल. त्यामुळे शेती, शेतकरी यांचा विकास होईल परिणामी देशाचा आर्थिक व सामाजिक विकास होईल.

जागतिकीकरणातून विदेशी मालांनी आपली बाजारपेठ भरून येईल, श्रीमंताच्या गरजेच्या वस्तुची भरभराट होऊन मुक्त चलन व्यवस्था, उद्योगांचे जाळे, नोकरीच्या असंख्य संधी, याबरोबरच भारताचा चेहरा मोहरा बदलुन जाईल असे वाटत होते. या विचारधारेमध्ये शेतकऱ्याचे नेते, शेतकरी संघटनेचे प्रणेते (शरद पवारांपासून ते शरद जोशीपर्यंत) अशी बतावणी करत होते की, जागतिकीकरण भारताच्या हिताचे आहे. परंतु एनरॉन प्रकल्प येण्यापूर्वी आपले वीजमंडळ नफ्यात होते ते जागतिकीकरणानंतर तोट्यात गेल्याने जागतिकीकरणाची वाहवा करणाऱ्याचे पितळ उघडे पडले आहे.

जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे अपेक्षीत असे काहीच घडले नाही तर जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे वस्तुवर आयात कर न लावता त्यावर असलेले निर्बंध दुर केले. बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेतीमध्ये गुंतवणूक करण्यास परवानगी दिली तर याविरोधी शेतीला पुरक व्यवसाय असणाऱ्या दुग्ध व्यवसायामध्येही गळचेपी धोरणे राबविले गेल्याची दिसते ते म्हणजे १) दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीवरील अनुदानामध्ये कपात करण्यात आली. २) आयात केलेल्या दुग्धजन्य पदार्थावरील आयात कर संतुलीत ठेवण्याऐवजी कमी करण्यात आले या विविध नियम व अटीमुळे भारतीय शेतकरी व शेतीसमोर अरिष्ठ निर्माण झाले. या अरिष्टाला सामोरे जाताना येथील शेतकऱ्यांनी आंदोलने केली. तर जिथे शेतकरी वर्ग असंघटीत आहे तेथे शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. वरील मुद्यांचे विवेचन करताना म्हणजे भारतीय शेतीवर जागतिकीरणामुळे झालेल्या परिणामामध्ये भारताने अनावश्यक साखरेची व गव्हाची आयात केली ती करत असताना २००% पर्यंत आयात कर लागु करण्याची कायदेशीर तरतूद असताना शासनाने मात्र फक्त ४०% आयातकर लागु करून साखरेची आयात केली. साखरेसारख्या, गव्हासारख्या इतर अनेक शेतमालाची आयात केली त्यांचा परिणाम अंतर्गत बाजारपेठेतील किंमतीवर होऊन दरांची घसरण झाली. एकीकडे जागतिकीकरणामुळे दरांची घसरण होत असताना दुसरीकडे वीज, खते, बी बियाणे जंतुनाशके यांच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली. यांचा दुसरा परिणाम म्हणजे कापड गिरण्याचे, सुतगिरण्याचे अवशेष शिल्लक राहिले तर साखर कारखान्याच्या संदर्भात विचार करता २०% साखरकारखाने आजारी असुन १५% साखर कारखाने बंद होण्याच्या मार्गावर आहेत. या सुतगिरण्या, साखर कारखाने बंद पडण्यामुळे तेथील कामगार व सभासद शेतकरी शेतमजुर आज बेकार व कर्जबाजारी झाले आहेत. शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे ते बँकांची थकबाकी परत करू शकत नाही. परिणामी ते कोणत्याही सहकारी संस्थाकडील कर्ज घेण्यास अपात्र ठरतात. अशा परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना आपला उदरनिर्वाह करण्यासाठी खासगी सावकारांकडून कर्ज घेणे भाग पडते आणि ते कर्ज परत करण्यामध्ये शेतकरी आपले आयुष्य वेचत आहे म्हणजेच आज जागतिकीकरणामुळे शेतीवर गंडातर येऊन शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहिला नाही.

**मुल्यमापन :**

भारतीय शेतीवर जागतिकीकरणाच्या परिणामासंदर्भात विचार करता असंख्य बदल झाल्याचे दिसून येतात. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार साधारणपणे २५% वाढला. जगातल्या अविकसित देशामध्ये साधारपणे २०% लोक राहतात. जागतिककरणामुळे झालेल्या व्यापार वाढीतून मिळालेल्या लाभाचे वितरण समन्यायी पद्धतीने झाले नाही. २५% वाढलेल्या व्यापारातील नफ्यामध्ये अविकसित देशाचा वाटा ०.३% आहे. तर २०% विकसीत देशाचा वाटा या नफ्यामध्ये ८६% आहे. यावरून जागतिकीकरणाच्या भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामाचे चित्र स्पष्ट होते.

दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणामुळे आपल्याला शेती विकासाच्या असंख्य शक्यता निर्माण झाल्या. कारण आपण पडिक जमीनी वहिवाटी खाली आणु शकतो, उपलब्ध पाण्याचा पर्यांत वापर भुगर्भातील जलसाठ्याचे पुनर्भरण होण्यासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन तसेच पावसाचा पाण्याचे संचयन करण्याच्या पद्धतीचा अवलंब करू शकतो. त्यासाठी जैन तंत्रज्ञानाची मदत होईल.

**संदर्भ :**

१. बेडकीहाळ किशोर, प्रा. एन. डी. पाटील : व्यक्तित्व आणि कर्तृत्व, सातारा, २००५.
२. सावंत दत्तात्रय, दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन, एम. फिल. अप्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९.
३. प्रा. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड प्रकाशन, २००९